**कायम विना अनुदान तत्वावरील माध्यमिक शाळा**
**परवानगीचे आदेश**
**महाराष्ट्र शासन**

क्रमांकः नमाशा १००३(१९५/२००३) माशि-१
शालेय शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२
दिनांकः १ एप्रिल, २००३

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद.

**विषयः- २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्याबाबत.**

नवीन माध्यमिक शाळेला परवानगी देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरून,खाली नमूद केलेली शैक्षणिक संस्थेस त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणासाठी आणि माध्यमातून सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून **कायम विना अनुदान तत्वावर** नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास या आदेशाद्वारे शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | मातोश्री तुलसी शिक्षण प्रसारक मंडळ, सिल्लोड जि. औरंगाबाद. | ओहर ता. जि. औरंगाबाद | मराठी | ८ वी |
| २ | अलसबाह एज्युकेशन सोसायटी , बार्वे जि. औरंगाबाद. | गरमपाणी ता.जि. औरंगाबाद. | उर्दू | ८ वी |

२. सदर संस्थेस माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबीची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.:-

(अ) या नवीन माध्यमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्यात आली असून, भविष्यात कधीही अनुदान, तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

(ब) सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवळी निघणा-या आदेशांचे माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

(क) शासनाच्या पूर्वपरवानगीचे निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.(ड) संस्थेच्या अध्यक्षाकडून कायम विना अनुदान तत्वावर माध्यमिक शाळा चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र घेऊन स्वतंत्रपणे ज. . करुन ठेवावे.

(इ) सदर संस्थाची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

(ई) " कायम विना अनुदान तत्वावर परवानगी मिळालेली शाळा " असा फलक अशा शाळेने ठळक अक्षरात दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा त-हेने लावणे संबधित संस्थेवर बंधनकारक राहील.

(फ) सदर कायम विना अनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने संबंधित अधिका-यांशी / शासनाशी पत्रव्यवहार करतांना " कायम विनाअनुदानित शाळा " अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

३. ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्तता केल्याची खात्री करुन,संबंधित नवीन माध्यमिक शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१) संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२) सदर संस्थे मार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

३) " कायम विना अनुदान " तत्वावरील शाळांच्या नोंदवहीत नोंद घेण्यात यावी.

४. विहित शर्तीची व अटींची पूर्तता केल्याची काटेकोरपणे पडताळणी केल्यानंतरच माध्यमिक शाळांना परवानगी दिली जाईल, अशी दक्षता विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी घ्यावी.

५. याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच सदर माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल शासनास त्वरित सादर करण्यात यावा.

(भि. य. मंता)

कक्ष अधिकारी , महाराष्ट्र शासन

प्रत,माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:

शिक्षण संचालक,(माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे

शिक्षणाधिकारी(माध्यमिक) जिल्हा परिषद ,जि औरंगाबाद.

मा.शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव,

मा.शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

निवड नस्ती, माशि-१.